# कृषी दिनी शेतकऱ्यांचा सत्कार







विशेष प्रतिनिधी

पालघर, दि. ०२ः महाराष्ट्र शासन कृषि विभाग, जिल्हा परिषद पालघर व पंचायत समिती पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने माजी मुख्यमंत्री व हरितक्रांतीचे जनक कै. वसंतरावजी नाईक यांच्या जन्मदिना निमीत्त १ जुलै २०२१ रोजी कृषि दिनाचे आयोजन करण्यांत आलेले होते. पंचायत समिती सभागृह, पालघर येथे हा कार्यक्रम पार पडला.

सदर कार्यक्रमास जिल्हा परिषद पालघर चे अध्यक्ष,मुख्य कार्यकारी अधिकारी,अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) कृषि विकास अधिकारी महाराष्ट्र शासनाचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी तसेच पंचायत समिती पालघर चे सभापती व गटविकास अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात विजय जगन्नाथ माळी, वसंतराव नाईक कृषिभुषण पुरस्कार २०१८ वसंतराव नाईक कृषि भुषण पुरस्कार व विनायक रघुनाथ बारी, वसंतराव नाईक कृषिभुषण पुरस्कार २०१९ विजेते शेतकरी तसेच विभागीय व जिल्हास्तरीय राबविण्यांत आलेल्या विविध पिक स्पर्धा योजने अंतर्गत प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त शेतकऱ्यांचा शाल, श्रीफळ व कालीपत्ती चिक्कु कलम देवुन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यांत आला. तसेच बिरसा मुंडा कृषि क्रांती योजने अंतर्गत लाभ घेतलेल्या शेतक–यांचा ही यावेळी सत्कार करण्यांत आला. जिल्ह्यातील सन्मानित शेतकऱ्यांच्या संखे मध्ये आणखी वाढ व्हावी तसेच आधुनिक शेतीचा अवलंब करून जास्तीत जास्त उत्पादन घ्यावे असे प्रतिपादन यावेळी जि.प.अध्यक्षा भारती कामडी यांनी केले.

शेतीकडे उद्योगाच्या दृष्टीकोनातून पहिले पाहिजे तसेच युवकांनी उद्योगशील शेती केली पाहिजे असे मत यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी व्यक्त केले. अति. मु.का.अ. चंद्रकांत वाघमारे यांनी शेतकऱ्यांनी एकात्मिक दृष्टीकोन ठेवून शेतीकडे पाहिले तरच शेती करणे परवडेल आणि उत्पादनात व उत्पन्नात वाढ होईल अशी आशा व्यक्त केली.

पान १ वरून